दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ✿ सोमवार, दि. ०७ सप्टेंबर २०२६ ✿ वर्ष : १ ✿ अंक : १३८ ✿ पाने : ४ ✿ किंमत : ४ रू. ✿ Email : hinduprakashvarta@gmail.com ✿ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

## पूनम पांडे म्हणतेय, 'वेश्याव्यवसाय कायदेशीर करा'!

**मुंबई :** प्रसिद्ध मॉडेल आणि अभिनेत्री पूनम पांडे नेहमीच तिच्या बोल्ड आणि वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असते. आता पूनम पांडेने अॅडल्ट कंटेंट आणि वेश्याव्यवसायाबाबत केलेल्या एका नव्या वक्तव्यामुळे सोशल मीडियावर आणि मनोरंजन सृष्टीत एकच खळबळ उडाली आहे. एका मुलाखतीत बोलताना तिने भारतामध्ये वेश्याव्यवसाय कायदेशीर करण्याची मागणी केली आहे.आरव्हीसीजे मूव्हीजला दिलेल्या मुलाखतीत पूनमने तिचे बोल्ड आणि अॅडल्ट व्हिडिओ हे एक प्रकारची 'मोठी सोशल सर्व्हिस' असल्याचे म्हटले आहे.

## डान्स क्लासला जाण्यावरून पती-पत्नीत वाद; मारहाणीत पत्नीचा मृत्यू

**नागपूर :** डान्स क्लासला जाण्याच्या किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून मद्यधुंद पतीने पत्नीला बेदम मारहाण केल्याची आणि उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना नागपुरात घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली असून त्याच्याविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामिनी कृष्ण लाल यादव (३८) असे मृत महिलेचे नाव असून, कृष्ण लाल यादव (४१) असे आरोपी पतीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, यामिनी आणि कृष्ण लाल हे नागपुरात त्यांच्या दोन मुलांसह राहत होते.

## थोडक्यात वार्ता

### विमानात हवेतच तांत्रिक बिघाड; बंगळुरू विमानतळावर लँडिंग



**बंगळुरू :** बंगळुरूहून लंडनला जाणाऱ्या व्हर्जिन अटलांटिकच्या विमानात उड्डाणानंतर तांत्रिक बिघाड झाल्याने विमान पुन्हा बंगळुरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे वळवण्यात आले. खबरदारीचा उपाय म्हणून विमानाने काही काळ हवेत फेऱ्या मारल्यानंतर सुरक्षित लँडिंग केली. विमानातील सुमारे २७० प्रवासी आणि क्रू सदस्य सुरक्षित असल्याची माहिती विमानतळ प्रशासनाच्या सूत्रांनी दिली आहे. व्हर्जिन अटलांटिकचे बंगळुरू-लंडन विमान रविवारी सकाळी सुमारे ८.२० वाजता बंगळुरू विमानतळावरून लंडनच्या दिशेने रवाना झाले. उड्डाणानंतर काही वेळातच विमानात तांत्रिक समस्या निर्माण झाल्याचे क्रूच्या लक्षात आले. प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देत वैमानिकांनी विमान बंगळुरूकडे परत वळवण्याचा निर्णय घेतला. विमान तातडीने विमानतळावर उतरवण्याऐवजी, सुरक्षित लँडिंगसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करत काही काळ तुमकुरू परिसराच्या हवाई हद्दीत फेऱ्या मारत राहिले. उपलब्ध माहितीनुसार विमानाने ३० मिनिटांहून अधिक काळ हवेत घिरट्या घातल्यानंतर बंगळुरूकडे परतण्यास सुरुवात केली.

### दिल्लीमध्ये इमारत कोसळली; एकाचा मृत्यू, अनेक जण अडकल्याची भीती

**नवी दिल्ली :** दिल्लीतील सत्य निकेतन परिसरात रविवारी एक बहुमजली इमारत अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या इमारतीत विद्यार्थी आणि पीजीमध्ये राहणारे नागरिक असल्याची प्राथमिक माहिती असून, अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकले असण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. दुर्घटनेत एकाचा मृत्यू झाला असून, किमान तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दक्षिण-पश्चिम दिल्लीतील मोतीबागजवळील सत्य निकेतन परिसरात, शिव मंदिराजवळ ही घटना घडली. दुपारच्या सुमारास अचानक इमारतीचा मोठा भाग कोसळला आणि काही क्षणांतच परिसरात मलब्याचा ढिगारा झाला. घटनेची माहिती मिळताच दिल्ली अग्निशमन दल, पोलीस आणि बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली.

### कांगोच्या किंशासामध्ये भीषण अग्नितांडव; लग्नाच्या पार्टीत 22 जणांचा मृत्यू

**कांगो :** कांगोच्या राजधानी किंशासामध्ये लग्नाच्या पार्टीदरम्यान भीषण आग लागून मोठी दुर्घटना घडली आहे. या आगीत आतापर्यंत किमान 22 जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता स्थानिक प्रशासनाने व्यक्त केली आहे. ही घटना शुक्रवारी रात्री उत्तर किंशासामधील लिंगवाला परिसरातील एका इमारतीत घडली. लग्नाची पार्टी सुरू असताना अचानक आग लागली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने पार्टीमध्ये उपस्थित असलेल्या लोकांमध्ये भीती पसरली. आगीपासून बचाव करण्यासाठी लोकांनी बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. मात्र, इमारतीतील अरुंद मार्गांमुळे बाहेर पडताना मोठी अडचण निर्माण झाली. त्यामुळे अनेक जण आत अडकले. आग शनिवारी पहाटेपर्यंत धुमसत होती. काही जखमींना बाहेर काढून रस्त्याच्या कडेला उपचारासाठी ठेवण्यात आले, तर काहींचा घटनास्थळीच मृत्यू झाला. लिंगवाला परिसराचे महापौर नॉर्बर्ट मुशिंगा यांनी मृतांचा प्राथमिक आकडा २२ असल्याची माहिती दिली. मात्र, जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो, असे त्यांनी सांगितले.

### "शाल जोडे"




# जालना जिल्ह्यातील रखडलेल्या विकासकामांविरोधात शिवसेनेचे जनआंदोलन

## 'जालन्याचा विकास, तुमसे ना हो पायेगा!'; अंबादास दानवेंचा सरकारवर हल्लाबोल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**जालना :** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'मराठवाड्याचा विकास, तुमसे ना हो पायेगा!' या मराठवाडाव्यापी जनआंदोलनाचा रविवारी जालना शहरात जोरदार एल्गार झाला. गांधी चौक, चमन येथे झालेल्या आंदोलनातून जिल्ह्यातील रखडलेल्या विकासकामांवरून सरकारला लक्ष्य करण्यात आले. विविध मंत्रिमंडळ बैठकींत जालना जिल्ह्यासाठी झालेल्या घोषणा प्रत्यक्षात आणाव्यात आणि वर्षानुवर्षे रखडलेले प्रकल्प तातडीने पूर्ण करावेत, अशी मागणी विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली.

जालना जिल्ह्याच्या विकासासाठी विविध काळात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकींत अनेक महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आल्या. अंबड येथील मत्स्योदरी देवी संस्थान विकासासाठी ४० कोटी रुपये, अंबड शहर भूमिगत गटार योजनेसाठी १६.५६ कोटी रुपये, जालना पाणीपुरवठा प्रकल्पासाठी अंबड येथे ३५ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्रासाठी ५६ कोटी रुपये, जालना येथे १५ एमएलडी जलशुद्धीकरण केंद्रासाठी ५६ कोटी रुपये, जाफराबाद नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी ४७.९८ कोटी रुपये आणि निम्न दुधना प्रकल्पासाठी ७२८.८५ कोटी रुपयांच्या कामांचा समावेश आहे.

याशिवाय जालना ड्राय पोर्ट, जालना–खामगाव १६५ किलोमीटर नवीन ब्रॉडगेज रेल्वेमार्ग, जालना–नांदेड द्रुतगती मार्ग जोडमार्ग, मराठवाडा वॉटर ग्रिडमधील जालना फीडर ग्रिड, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ४३० खाटांचे रुग्णालय, जालना–देऊळगाव राजा–चिखली महामार्गाचे चौपदरीकरण, जालना–अंबड–गेवराई महामार्गाचे रुंदीकरण, भूमिगत मलनिस्सारण व निचरा योजना, जायकवाडी डावा कालवा दुरुस्ती आणि घनवाडी जलाशय पुनरुज्जीवन या प्रकल्पांकडेही आंदोलनातून लक्ष वेधण्यात आले.

घोषणा होऊन अनेक वर्षे उलटली, तरी अनेक प्रकल्प अद्याप पूर्णत्वास गेलेले नाहीत. काही कामे संथगतीने सुरू असून काही प्रकल्पांची अंमलबजावणी अद्याप अपेक्षित पातळीवर झालेली नाही. सरकारने केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष कामे पूर्ण करून जनतेला विकासाचा लाभ द्यावा, अशी भूमिका दानवे यांनी मांडली.

## पनवेलमध्ये दहीहंडी उत्सवाला गालबोट; विजेचा धक्का बसून 7 जण जखमी

**पनवेल :** दहीहंडी उत्सवाच्या जल्लोषाला पनवेलमध्ये गालबोट लागले. शहरातील लाईन आळी परिसरात दहीहंडी उत्सवादरम्यान विजेचा प्रवाह उतरल्याने सात जणांना विजेचा धक्का बसल्याची घटना ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी घडली. जखमींमध्ये एका सात वर्षीय चिमुकलीचाही समावेश आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ खळबळ उडाली. पनवेल शहरातील शिवसेना शाखेजवळील नवनाथ पंथीय आस्थानात पारंपरिक पद्धतीने दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. या ठिकाणी गेल्या अनेक वर्षांपासून मानवी मनोरा न रचता सुमारे सहा ते सात फूट उंचीवर दहीहंडी फोडण्याची परंपरा असल्याचे वृत्त आहे. यंदाही मोठ्या उत्साहात हा उत्सव पार पडत असताना अचानक काही जणांना विजेचा धक्का बसला. या घटनेत एकूण सात जण जखमी झाले. त्यामध्ये एका सात वर्षीय मुलीचाही समावेश आहे. विजेचा धक्का बसल्यानंतर जखमींना तातडीने उपचारासाठी वेगवेगळ्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले. काही जखमींवर प्राथमिक उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले असून, काहींवर उपचार सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत विद्युत पुरवठा खंडित केला. यामुळे पुढील धोका टाळण्यात आला. पनवेल शहर पोलिसांनीही घटनास्थळी पोहोचून घटनेची माहिती घेतली. दरम्यान, विजेचा प्रवाह नेमका कशामुळे उतरला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे या दुर्घटनेमागचे नेमके कारण काय, याचा तपास आणि पडताळणी होणे महत्त्वाचे आहे.

# राजस्थान महापालिका निवडणुकीत चंद्रशेखर बावनकुळे यांचा झंझावात

## 10 शहरांमध्ये भाजपच्या प्रचाराची सांभाळली धुरा



**राजस्थान :** महाराष्ट्राचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राजस्थानमधील महानगरपालिका निवडणुकीत पक्षाच्या प्रचारात आणि व्यवस्थापनात मोठी कामगिरी बजावली आहे. भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी त्यांची राजस्थान महानगरपालिका निवडणुकीसाठी सहप्रभारी म्हणून नियुक्ती केली होती. गेल्या 15 दिवसांपासून ते राजस्थानमधील 10 महानगरपालिकांच्या निवडणूक व्यवस्थापनाची जबाबदारी सांभाळत असून प्रचारात सक्रिय सहभागी झाले आहेत.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी जयपूर, कोटा, भरतपूर, जोधपूर, उदयपूर, अजमेर, पाली, बिकानेर, भिलवाडा आणि अलवर या महानगरपालिका क्षेत्रांचे दौरे केले. या काळात त्यांनी कार्यकर्ते संमेलने, बैठका, पदयात्रा आणि गृहभेटींच्या माध्यमातून संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यावर भर दिला. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातील भाजपा आमदार आणि प्रमुख पदाधिकारीही या विजयी रणनीतीत सहभागी झाले आहेत. प्रचारादरम्यान त्यांनी राजस्थानमध्ये राहणाऱ्या महाराष्ट्रीयन नागरिकांशी, व्यावसायिक, शैक्षणिक क्षेत्रातील प्रमुख व्यक्ती आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. निवडणुकीच्या रणनीतीसाठी ते राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय मंत्री आणि स्थानिक नेत्यांसोबत सतत समन्वय साधत आहेत. या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे भाजपाला निवडणुकीत मोठे यश मिळेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# भार निर्माण विरुद्ध खळी येथील ग्रामस्थांचे नदीपात्रात जल समाधी आंदोलन

## महावितरणच्या भोंगळ कारभार मुळे ग्रामस्थ त्रस्त ; शेतीसाठी 24 तास वीज पुरवठा देण्याची खळीकरांची मागणी

हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार



**परभणी:-** अनेक दिवसापासून महावितरणच्या चाललेल्या ढिसाळ कारभारामुळे गंगाखेड तालुक्यातील अनेक गावातील शेतकरी हवालदिल झाले असून. एकतर पाऊस पडेना व दुसरीकडे महावितरण विज शेतकऱ्यांना वेळेवर उपलब्ध होत नसल्याने महावितरण च्या कंपनीच्या भोंगळ कारभार व बाहेर नियमनविरुद्ध खळी येथील ग्रामस्थांनी उतरून दिनांक 6 सप्टेंबर रविवार रोजी जलसमाधी आंदोलन करत शेतीसाठी 24 तास वीज पुरवठा देण्याची मागणी केली आहे.

पाऊस नसल्याने सध्या सर्वत्र दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असून शेतात उभी पिके पावसाच्या भरवशावर असताना वीज वितरण कंपनीकडून मात्र बाहेर नियमनात वाढ करण्यात आली असून पावसाळ्यात सुद्धा शेतीसाठी केवळ दोन तास वीज उपलब्ध होत असून अपुऱ्या पडणाऱ्या विज वीज पुरवठ्यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून हाती आलेला घासही हातातून निघून जाईल या भीतीने शेतकरी वर्गामध्ये खळबळ उडाली असून या भीती पोटी शेतीसाठी तातडीने 24 तास वीज पुरवठा उपलब्ध करून द्यावा तसेच सकाळ संध्याकाळचे होणारी पाच पाच तासाचे भारनियमन रद्द करून सुरळीत वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा खळी चिंचटाकळी येथील ग्रामस्थांनी दिनांक सहा सप्टेंबर रविवार रोजी ओमकार पवार विजय सोनार यांच्या नेतृत्वाखाली असंख्य ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी खळी येथील गोदावरी नदीच्या पात्रात उतरून जलसमाधी आंदोलन केले या आंदोलनादरम्यान महावितरण कंपनीने अधिकाऱ्यांना ग्रामस्थांकडून जाब विचारण्यात आला ग्रामस्थ व शेतकऱ्याच्या मागण्याबाबत महावितरण प्रशासन काय निर्णय घेतो याकडे ग्रामस्थांचे लक्ष वेधले असून या आंदोलनात वामनराव ढोबळे बालासाहेब कांबळे गजानन लांडे बाळासाहेब सावळे माऊली करवर अंबाजी प्रल्हाद झुरे चांगदेव सोनार आधी सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने यावेळी रामभाऊ सावळे डॉक्टर सुभाष कदम पोलीस पाटील पुंडलिक सुरवसे पोलीस जमादार विनोद चव्हाण व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते लवकरात लवकर वितरण प्रशासनाने वीज पुरवठा उपलब्ध करून द्यावा अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली.

# सार्वजनिक गणेशोत्सवाचे काटेकोर नियोजन करा; पालकमंत्री संजय शिरसाठ यांचे निर्देश

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** सार्वजनिक गणेशोत्सव हा शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेचा महत्त्वाचा भाग असून, यंदाचा हा उत्सव शांततेत, सुरक्षित आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे स्पष्ट निर्देश पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी दिले. उत्सवाच्या आनंदाला गालबोट लागणार नाही आणि गणेश मंडळांना परवानगी मिळताना कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सार्वजनिक गणेशोत्सवच्या पूर्वतयारीसंदर्भात पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्या अध्यक्षतेखाली आज एमआयटी युनिव्हर्सिटी कॅम्पस, बीड बायपास रोड येथील मंथन हॉलमध्ये एका समन्वय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस माजी खासदार चंद्रकांत खैरे, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त कल्पना पिंपळे, पोलीस उपायुक्त शशिकांत सातव, महावितरणचे अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीदरम्यान पालकमंत्र्यांनी प्रशासनाला विविध महत्त्वाचे निर्देश दिले. गणेशोत्सवादरम्यान शहरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी विशेष नियोजन करावे तसेच महानगरपालिका व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी रस्ते, स्वच्छता, विसर्जनस्थळे आणि वीजपुरवठ्याशी संबंधित समस्या तातडीने सोडवाव्यात, असे ते म्हणाले. मुंबईतील एका दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर गर्दीचे व्यवस्थापन, मिरवणूक मार्ग आणि विसर्जनस्थळी सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष खबरदारी घेताना महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. गणेश मंडळांना आवश्यक परवानग्या मिळवताना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागणार नाही, याची दक्षता घ्यावी, असेही निर्देश त्यांनी दिले. उत्सवाच्या शेवटच्या पाच दिवसांत नियमानुसार रात्री १२ वाजेपर्यंत ढोल पथके व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील, मात्र ध्वनिप्रदूषणासंदर्भातील नियमांचे काटेकोर पालन व्हावे आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, असे सांगत मंडळांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि विधायक उपक्रमांवर भर द्यावा, असे आवाहन पालकमंत्र्यांनी केले.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी बैठकीत पोलीस विभागाच्या तयारीची माहिती देताना सांगितले की, शहरातील बंदोबस्त, वाहतूक व्यवस्था, मिरवणूक मार्ग आणि गर्दीचे नियोजन केले जात असून वाळूज व पंढरपूर परिसरासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. तसेच गतवर्षीप्रमाणे यंदाही डीजेच्या वापराबाबत प्रभावी कार्यवाही केली जाईल. गेल्या दोन वर्षांत शहरात अंमली पदार्थांविरोधात मोठी कारवाई करण्यात आली असून गणेशोत्सव काळातही अवैध व समाजविघातक कृत्यांवर पोलिसांचे बारकाईने लक्ष राहील.

यावेळी उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनी मंडळांना सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम सादर करण्याची संधी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली, तसेच उत्सवाच्या दोन दिवस आधीपासून 'ड्राय डे' ठेवण्याची मागणी केली. महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छता, रस्ते व विसर्जनस्थळांची तयारी पूर्ण करण्यात आल्याचे अतिरिक्त आयुक्त कल्पना पिंपळे यांनी सांगितले, तर महावितरणतर्फे सुरळीत वीजपुरवठ्याचे नियोजन स्पष्ट करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पोलीस उपायुक्त शशिकांत सातव यांनी केले.

# दिगरच्या स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ताच नाही; अंत्यविधी थांबवून ग्रामपंचायतीसमोर मृतदेह ठेवला; महसूल विभागाच्या आश्वासनानंतर अंत्यसंस्कार

हिंदू प्रकाशवार्ता / बापूसाहेब हरणकाळ



**पिशोर :** दिगर येथील स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता गेल्या चार-पाच वर्षांपासून वादग्रस्त पुलाचे काम आणि हद्दीच्या प्रश्नामुळे रखडला आहे. पुलाचे काम पूर्ण होऊनही स्मशानभूमीकडे जाण्यासाठी कायमस्वरूपी रस्ता उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना सातत्याने अडचणींचा सामना करावा लागत आहे. अखेर या प्रश्नाचा संताप रविवारी अंत्यविधीच्या वेळी उफाळून आला. अंत्यविधी थांबवून संतप्त ग्रामस्थांनी मृतदेह पिशोर ग्रामपंचायत कार्यालयासमोर आणून ठेवला.

दिगर येथील हरणाबाई नामदेव नवले यांचे शनिवारी (दि. ५ सप्टेंबर) निधन झाले. रविवारी (दि. ६) कोळंबी-भारंबा रोडवरील दिगर स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्याचे नियोजन होते. मात्र, स्मशानभूमीकडे जाण्यासाठी व्यवस्थित रस्ता उपलब्ध नसल्याने मृतदेह स्मशानभूमीत नेण्याचा प्रश्न निर्माण झाला.

यामुळे संतप्त नातेवाईक व ग्रामस्थांनी स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता कायमस्वरूपी मोकळा करून द्यावा, अन्यथा अंत्यविधी पिशोर ग्रामपंचायत कार्यालयासमोरच करण्यात येईल, अशी भूमिका घेतली. त्यानंतर हरणाबाई नवले यांचा मृतदेह सुमारे एक ते दीड तास ग्रामपंचायत कार्यालयासमोर ठेवण्यात आला. या प्रकारामुळे गेल्या चार-पाच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्त्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले.

घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाचे अधिकारी व पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. कन्नडचे नायब तहसीलदार दिलीप सोनवणे, मंडळ अधिकारी अलका पत्रे, पिशोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी यांच्यासह महसूल व पोलीस अधिकारी-कर्मचाऱ्यांनी ग्रामस्थ व नातेवाईकांशी चर्चा केली.

यावेळी प्रशासनाच्या वतीने हद्दीचा प्रश्न तातडीने मार्गी लावून स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता मोकळा करण्यासाठी कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच एका महिन्याच्या आत रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांनी आपली आक्रमक भूमिका मागे घेतली.

दरम्यान, दिगर पंच कमिटीच्या वतीने जेसीबीच्या सहाय्याने तात्पुरत्या स्वरूपात स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता तयार करण्यात आला. त्यानंतर हरणाबाई नवले यांचा मृतदेह डिगर स्मशानभूमीत नेण्यात आला व अंत्यसंस्कार करण्यात आले.



# सं पा द की य

## भारताचा बदलता चेहरा

देशाची अंतर्गत सुरक्षा आणि युवा पिढीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी केंद्र सरकारने हाती घेतलेले प्रयत्न आता निर्णायक वळणावर पोहोचले आहेत. गोवा येथे एका उच्चस्तरीय पत्रकार परिषदेला संबोधित करताना केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी देशातील अमली पदार्थ विरोधी मोहिमेची आकडेवारी आणि अंतर्गत सुरक्षेच्या क्षेत्रात झालेली ऐतिहासिक प्रगती जगासमोर मांडली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मागील काही वर्षांत दहशतवाद, नक्षलवाद आणि अंमली पदार्थांच्या तस्करीविरोधात छेडण्यात आलेल्या मोहिमेमुळे देशाची सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत झाली असून, 'विकसित भारत २०४७' च्या दिशेने एक भक्कम पाया रचला जात आहे. अमली पदार्थांच्या निर्मूलनाबाबत बोलताना गृहमंत्री शाह यांनी विरोधकांच्या काळातील आणि वर्तमान सरकारच्या काळातील कामगिरीची तुलनात्मक आकडेवारी सादर केली. २००४ ते २०१४ या दशकात २६ लाख किलोग्रॅम अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते, ज्याची किंमत सुमारे ४०,००० कोटी रुपये होती. याउलट, २०१४ ते २०२६ या कालावधीत मोदी सरकारच्या काळात १ कोटी १९ लाख किलोग्रॅमपेक्षा अधिक अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, त्यांची किंमत सुमारे १ लाख ८९ हजार कोटी रुपये आहे. तसेच जप्त केलेले ६० लाखांहून अधिक किलोग्रॅम अमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत. 'नशामुक्त भारत अभियाना'अंतर्गत २५ कोटी नागरिकांपर्यंत पोहोचून शपथ देण्यात आली असून, ५ लाख ७० हजार नागरिकांना उपचार व पुनर्वसनाद्वारे व्यसनमुक्त करण्यात आले आहे. आगामी २०२६ ते २०२९ हा काळ 'मिशन मोड' म्हणून घोषित करण्यात आला असून, चार स्तंभांवर आधारित पथदर्शी आराखड्याच्या माध्यमातून हा लढा तीव्र केला जात आहे. केवळ अमली पदार्थच नव्हे, तर देशाच्या अंतर्गत सुरक्षेसमोर असलेली दहशतवाद, नक्षलवाद आणि ईशान्येतील अशांततेची मोठी आव्हाने यशस्वीपणे संपुष्टात आली आहेत. जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० रद्द केल्यानंतर फुटीरतावाद आणि दहशतवादी घटना शून्yच्या दिशेने वाटचाल करत आहेत, तर पाच दशकांपासून देशतेला त्रस्त करणारी नक्षलवादाची समस्या जवळपास संपुष्टात आली आहे. 'भारतपोल'च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर ३६ देशांमधून २७४ फरार आरोपींचे प्रत्यार्पण करण्यात आले असून, १७,८७४ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत. नवीन फौजदारी कायद्यांच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे दोषसिद्धीच्या दरात झालेली वाढ ही न्यायव्यवस्थेचे मोठे यश आहे. तरुण पिढीला व्यसनांपासून दूर ठेवून आणि कडक कायदेशीर धोरणांची अंमलबजावणी करून भारत एका सुरक्षित आणि आत्मविश्वासी भविष्याकडे वाटचाल करत आहे.

## रसायन तंत्रज्ञान विभागात विविध कार्यक्रमांनी शिक्षकदिन उत्साहात

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रसायन तंत्रज्ञान विभागात शिक्षक दिन विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शिक्षकांच्या ज्ञानदानाच्या कार्याचा, मार्गदर्शनाचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासातील योगदानाचा गौरव करण्यात आला.

विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. प्रवीण वक्ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. धनश्री महाजन, अधिष्ठाता, मानवविद्या शाखा यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी रसायन तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. भगवान साखळे होते. प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी प्रा. साखळे यांनी शिक्षकदिनाचे महत्त्व विशद करताना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, बौद्धिक व व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले.

प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. प्रवीण वक्ते म्हणाले, शिक्षक हे समाजाच्या आणि राष्ट्राच्या जडणघडणीतील महत्त्वाचे घटक आहेत. विद्यार्थ्यांनी शिक्षकांकडून मिळणाऱ्या ज्ञानाचा आणि मार्गदर्शनाचा योग्य उपयोग करून समाजाच्या प्रगतीमध्ये योगदान द्यावे, असे आवाहन केले.

समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला. शिक्षकांच्या कार्याचा गौरव आणि विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेली कृतज्ञता यामुळे संपूर्ण कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विविध उपक्रमांद्वारे शिक्षकदिन साजरा केला. कार्यक्रमास विभागातील प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साखर - इथेनॉल आणि संकट

भारतात काही महिन्यांपासून इथेनॉल मिश्रित पेट्रोल वरून मोठा वाद सुरू आहे. २०% इथेनॉल मिश्रित पेट्रोल (ए-20) वापरणाऱ्या अनेक वाहनधारकांना गाड्यांच्या इंजिन मध्ये खराबी होणे तसेच मायलेज कमी मिळणे अशा समस्या होत असल्याच्या तक्रारी केल्या जात आहेत. त्यातच भर पडली ती साखर तुटवडा, अचानक वाढणारे दर आणि साखर आयातीचा निर्णय. राजकारणासाठी ही मुद्दे भरभरून वापरले जाणार आहेत पण हे भारतावर आलेले संकट आहे. त्यातून बाहेर कसे पडावे व या परिस्थितीचा शेतकरी व ग्राहकांवर काय परिणाम होईल याचा धांडोळा घेणे आवश्यक आहे.

### साखरेची अचानक दर वाढ का?

भारत हा प्रमुख साखर उत्पादन करणारा देश व जगातील दोन नंबरचा निर्यातदार देश आहे. दर वर्षी लाखो टन साखर निर्यात भारत करत होता व परकीय चलन मिळवत होता. या वर्षी मात्र निर्यात तर बंद करावी लागलीच, पण १० लाख टन साखर आयात करण्याची नामुष्की ओढवली आहे. याची जी कारणे सांगितली जातात त्यातील महत्वाचे कारण म्हणजे सरकारकडे साखर उत्पादनाचा निश्चित आकडा नव्हता. अतिवृष्टी सारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे ऊसाचे उत्पादन व साखर उतारा घटला व सरकार आणि साखर उद्योगाचा अंदाज चुकला. दुसरे असे ही म्हटले जाते की ऑक्टोबर महिन्या पर्यंत पुरेल इतका साखर साठा देशात आहे पण तो गायब झाला आहे! कोणाकडे आहे हा साठा? पुढे येणाऱ्या सणासुदीच्या दिवसात साखरेला मागणी वाढून दर वाढतील या अपेक्षेने काही मंडळींनी साखर साठवून ठेवली आहे असा अंदाज केला जातो. इथेनॉलसाठी साखर वळवल्यामुळे साखर उत्पादन कमी झाले म्हणून तुटवडा निर्माण झाला असाही मत प्रवाह आहे.

### दर नियंत्रणासाठी सरकारची उपाय योजना

साखरेचा तुटवडा होणार हे लक्षात येताच भारत सरकारने १३ मे २०२६ रोजी साखरेवर निर्यातबंदी ठोकली ती ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत. साखर साठ्यांवर मर्यादा घोषित केली. तरी सुद्धा साखरेचे दर कमी होण्याची लक्षणे दिसेनात तेव्हा सरकार ने १० लाख मे. टन कच्ची साखर, ब्राझील कडून आयात करण्याचा निर्णय घेतला. या उपाय योजनांचा फार फायदा होईल असे वाटत नाही कारण ब्राझील वरून साखर भारतात पोहोचायला दोन महिने लागणार आणि कच्च्या साखरेवर प्रक्रिया करून बाजारात यायला आणखी १५ दिवस तरी लागणार. तो पर्यंत बहुतेक सर्व सण उरकून गेलेले असतील आणि भारतातली साखर कारखाने सुरू होऊन बाजारात मुबलक साखर उपलब्ध असेल.

### दरवाढीचा शेतकऱ्यांना किती फायदा?

देशातील साखर विक्री सरकारद्वारा नियंत्रित आहे. दर १५ दिवसाला कोणता कारखाना किती साखर विकेल हे सरकार सांगते त्यामुळे साखर कारखान्या कडील बहुतेक साखरेची विक्री निर्धारित दरात झालेली आहे. जो साठा शिल्लक आहे तो सुद्धा सरकारच्या नियंत्रणात विकावा लागणार आहे. अशा परिस्थितीत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना या दर वाढीचा फार फायदा होईल असे दिसत नाही.

सरकारने आयात केलेली साखर ही आपला गाळप हंगाम सुरू झाल्या नंतर भारतात येणार असल्यामुळे या अतिरिक्त पुरवठ्याचा परिणाम भारतात उत्पादित साखरेच्या दरावर होऊ शकतो. एकूणच साखर दर वाढीचा फायदा थेट शेतकऱ्यांना मिळणे अवघडच दिसते.

### साखर कारखान्यातील लबाडी

साखर उद्योगात एक काळ असा होता की कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील साखर कारखान्यांचा साखर उतारा १२ - १३ टक्के असायचा मध्य महाराष्ट्रात ११.५० वह्या दरम्यान असायचा. साखर उताऱ्यावर दर ठरू लागल्यापासून साखर उतारा घसरू लागला व तो आता ९.५० ते १०.५० वर आला आहे. ऊसाला दर कमी देण्यासाठी साखर उतारा चोरला जातो असा शेतकऱ्यांचा आरोप आहे. साखर उतारा चोरून तयार झालेली साखर कुठेच हिशोबत येत नाही व कळ्या बाजारात रोखीने विकली जाते. सध्या निर्माण झालेल्या तुटवड्याला हे ही एक कारण आहे असे आरोप काही शेतकरी करत आहेत. शेतकऱ्याने कारखान्याला दिलेल्या ऊसाच्या वजनात सुद्धा काटा मारी होते व त्यापासून तयार झालेली साखर सुद्धा अशीच कळ्या बाजारात विकली जाते हे उघड गुपित आहे.

पूर्वी साखर विक्रीवर लक्ष ठेवण्यासाठी साखर कारखान्यावर अबकारी खात्याचे कर्मचारी असायचे परंतू आता ते हटवल्यामुळे साखर कारखान्यांना मोकळे. रान सापडले आहे.

### छुपे साखर साठे शोधा

भारतातील साखरेचे उत्पादन सन २०२५-२६ मध्ये २८० लाख मे टन होते व शिल्लक साठा ३२ ते ३५ मे टन होता. महिन्याला सरासरी २२ लाख टन साखर विक्री होते मग वर्षभरात २६४ लाख टन साखर लागते साठा तर ..... ३१५ लाख मे टन होता, मग टंचाई का निर्माण झाली व ही साखर गेली कुठे हा खरा प्रश्न आहे.

साखरेची दरवाढ झालीच तर ती हळू हळू रुपया दोन रुपये प्रतिकिलो दराने होते पण या वेळेस एकदम ४०% वाढ पंधरा दिवसातच झाली त्यामुळे यात काहीतरी घोटाळा आहे याचा संशय येणे साहजिक आहे. ऊसाचा दर, साखरेचा दर आणि विक्रीचा कोटा सरकारच्या हातात असताना सरकारला शिल्लक साठ्याचा अंदाज येऊ नये हे समजण्या सारखे नाही. यात सरकारात सामील असलेले व सरकारच्या जवळचे व्यापारी/ उद्योजक हे या भाववाढीचे खरे लाभार्थी असणार आहेत असे मानायला हरकत नाही. खरा तोटा होणार तो ग्राहकाचा. ऐन सणासुदीच्या दिवसात सामान्य ग्राहकाच्या खिशाला चाट बसणार आहे हे नक्की.

### संकट कोणावर?

साखरेसाठी ग्राहकांना जास्त किंमत मोजावी लागणार हे खरे पण खरा फटका बसणार आहे तो साखर उद्योग आणि ऊस उत्पादकांना. पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून सरकार साखर उद्योगावर आणखी निर्बंध लदणार. त्या बरोबरच इथेनॉलसाठी साखर उत्पादन घटविले अशी ओरड होत असल्यामुळे या पुढे ऊसापासून इथेनॉल निर्मितीवर प्रतिबंध येतील. आताच साखर कारखान्यांनी तयार केलेले इथेनॉल तेल कंपन्या खरेदी करत नसल्यामुळे कारखाने अडचणीत आहेत, त्यात इथेनॉल निर्मितीच बंद केली तर आणखी संकट येऊ शकते. कुठल्याही उत्पादनात पक्क्या माला पेक्षा कच्चा माल स्वस्त असतो पण साखर उद्योगात ऊस ३४०० रुपये व साखर ३१०० रुपये असा हिशोब आहे. गुऱ्हाळ उद्योगाशी स्पर्धा करताना साखर कारखान्यांची दमछाक होत आहे. एकूणच साखर उद्योग आणि ऊस उत्पादक सरकारच्या धोरणामुळे अडचणीत येत आहे.

### धरसोडीचे धोरण हा मुख्य अडसर

भारतातील साखर उद्योगच नाही तर सर्व शेतीमाल आयती निर्याती बाबत सरकारचे धर सोडीचे धोरण अत्यंत मारक आहे. सन २०२५-२६ या गाळप हंगामाच्या सुरुवातीला अतिरिक्त साखर उत्पादन होईल या अपेक्षेने २० लाख टन साखर निर्यातीचा निर्णय झाला. मात्र साखर निर्यातीतुन परवडतील असे दर मिळत नसल्यामुळे फक्त आठ लाख टन साखर निर्यात होऊ शकली. नंतर लक्षात आले की साखरेचा तुटवडा येऊ शकतो तेव्हा १३ मे २०२६ पासून साखर निर्यात बंद केली. आता आणखी टंचाई व भाववाढ समोर दिसत आहे तेव्हा १० लाख टन साखर आयात करण्याचा निर्णय झाला आहे. आता शून्य टक्के आयात शुल्क आकारून आयात होत आहे, आता पर्यंत साखर निर्यातीवर १००% आयात शुल्क आकारले जात असे. भारत सरकारच्या अशा धर सोडीच्या धोरणामुळे साखर उद्योग कायम अडचणीत आला. आहे व त्याचा फटका शेतकरी व ग्राहकांना सहन करावा लागत आहे.

### इथेनॉल - असून अडचण, नसून खोळंबा

पेट्रोल मध्ये इथेनॉलचे मिश्रण केल्यामुळे भारताला आयात करावे लागणारे कच्चे खनिज तेल कमी प्रमाणात आयात करावे लागेल व भारताचे परकीय चलन कमी खर्च होईल हा मुख्य हेतू इथेनॉल मिश्रणामागे आहे व तो बरोबर आहे. इथेनॉलमुळे वातावरणात कमी कार्बन सोडला जाईल व प्रदूषण आटोक्यात राहील हा सुद्धा तर्क बरोबर आहे. पुढे शेतकऱ्यांच्या पिकांना जास्त दाम व ग्राहकांना स्वस्त पेट्रोल असा ही प्रचार मोठ्या प्रमाणात झाला.

शेतकरी नेते स्व. शरद जोशी यांनी २००८ या वर्षी इथेनॉल या विषयावर खास अधिवेशन घेऊन ही सर्व फायदे शेतकऱ्यांना सांगितले होते. आपल्या शेतात इथेनॉल तयार करण्याचे आंदोलन ही दिले होते.

### घोळ कुठे झाला?

इथेनॉल हे नक्कीच फायदेशीर आहे. भारतात २००१ पासून इथेनॉलच्या चाचण्या सुरू झाल्या व नंतर पेट्रोल मध्ये ५% व १०% इथेनॉल मिसळण्यास सुरुवात झाली. २०३० पर्यंत भारत २०%इथेनॉल मिश्रित पेट्रोल वितरित करण्याचे लक्ष ठरले होते. दरम्यान सी हेवी बरोबर बी हेवी मळी पासून व थेट ऊसाच्या रसापासून इथेनॉल निर्मितीचे तंत्र विकसित झाले व तसे कारखाने / आसवनी/ डिस्टिलरी उभ्या राहिल्या. धान्य पासून सुद्धा इथेनॉल तयार करणारे प्रकल्प उभे राहिले. मोठ्या प्रमाणात तयार होणाऱ्या इथेनॉलचे करायचे काय? हा प्रश्न उभा राहिल्यामुळे २०३० च्या अगोदर पाच वर्ष ई - २० पेट्रोल बाजारात आले. ज्या वाहनांची इंजिन त्या प्रकारच्या इंधनाला पूरक नाहीत, त्याच्या तक्रारी येऊ लागल्या तसेच गाड्यांचे मायलेज कमी झाले. प्रवासाचा व वाहन दुरुस्तीचा खर्च वाढल्यामुळे जनता कुरकुर करू लागली. तयारी नसताना २०% इथेनॉल मिश्रित पेट्रोल बळजबरी ढकलणे सरकारला महागात पडले आहे.

### सरकारी धान्य पुरवठ्याचा खोडा

सरकार शेतकऱ्यांकडून आधारभूत किमतीने धान्य खरेदी करते. बफर स्टॉकच्या गरजे पेक्षा पाच पट तांदूळ अन्न महामंडळाच्या गोदामा मध्ये साठवले आहे. ठेवायला जागा नाही, मग सरकारने इथेनॉलसाठी हे धान्य पुरवायला सुरुवात केली. तांदुळाची खरेदी किंमत ३८८९/- रु प्रति क्विंटल आहे. साठवणुकीचा व वाहतुकीचा खर्च वेगळा. हाच तांदूळ अन्न महामंडळ इथेनॉल निर्मितीसाठी २३२०/- रु प्रति क्विंटल दराने पुरवते. त्यामुळे ऊसा पासून तयार होणारे इथेनॉल महाग वाटते. सरकारने जे इथेनॉल मागील वर्षी खरेदी केले त्या पैकी ७६% धान्यापासून तयार केलेले आहे. साखर कारखान्यांनी तयार केलेले इथेनॉल विक्री अभावी पडून आहे.

इथेनॉल खरेदी दरात ही भेदभाव आहे. ऊसा पासून तयार होणाऱ्या इथेनॉलचे दर असे आहेत. सी हेवी - ४९.४१, बी हेवी - ६०.७३ आणि रस किंवा सिरप पासून तयार होणाऱ्या इथेनॉलला ६५.६१ रुपये प्रति लिटर दर दिला जातो तर तांदळापासून तयार होणाऱ्या इथेनॉलला ५८.४० व मक्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉलला ७१.८० रु प्रति लिटर असा दर दिला जातो. हा भेदभाव का? इथेनॉल तर सारखेच असते मग दरात फरक का असा प्रश्न विचारावा वाटतो.

### कोणते इथेनॉल फायदेशीर?

ऊसापासून तयार होणाऱ्या इथेनॉल मध्ये आणि धान्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉल मध्ये फायदेशीर कोणते असा विचार केला तर साखर कारखान्यात तयार होणाऱ्या इथेनॉलसाठी बाहेरून ऊर्जा किंवा इंधन घ्यावे लागत नाही. बग्यास भी की जाळून वाफ तयार केली जाते व इथेनॉल निर्मितीसाठी वापरली जाते. धान्यापासून इथेनॉल तयार करण्यासाठी मात्र वीज किंवा गॅस सारखे इंधन विकत घ्यावे लागते.

ऊसापासून तयार झालेल्या इथेनॉलसाठी खर्च केलेल्या इंधनाच्या ७ ते ९ पट इंधन तयार होते. धान्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉलसाठी खर्च केलेल्या इंधनाच्या फक्त १.४ ते २ पट इंधन तयार होते. त्यामुळे साखर कारखान्यातून तयार होणाऱ्या इथेनॉलचा ऊर्जा परतावा जास्त आहे.

ऊसाच्या रसात किंवा मळी मध्ये साखर असते त्यामुळे ते लगेच फर्मेंट करता येते. धान्यापासून तयार होणाऱ्या इथेनॉलसाठी मात्र अगोदर धान्याचे स्टार्चचे साखरेत रूपांतर करावे लागते त्यात बरीच ऊर्जा खर्च होते.

### शेतकऱ्यांचा खर्च फायदा होतो का?

इथेनॉल निर्मितीमुळे शेतकऱ्यांना जास्त पैसे मिळतील असा प्रचार केला जातो मात्र प्रत्यक्ष ऊसाच्या शेतकऱ्यांना इथेनॉल फायदा वाढीव दरात मिळत नाही असे शेतकरी म्हणतात. इथेनॉल व इतर उपपदार्थ ऊस दराच्या हिशोबत धरलेच जात नाहीत. रंगराजन समितीने दिलेल्या सूत्रानुसार फक्त साखर निर्मिती असेल तर साखरेच्या दराच्या ७५-२५ अशी विभागणी होते व उपपदार्थाचे ७०-३० अशी विभागणी होते. मजेची गोष्ट म्हणजे इथे ' उपपदार्थ ' म्हणजे फ्लॅट बाग्यास, मळी व प्रेस मड आहेत. इथेनॉल किंवा इतर उपपदार्थ यात गणले जात नाहीत त्यामुळे इथेनॉलचा फायदा शेतकऱ्यांना मिळतो असे म्हणता येणार नाही.

धान्यापासून इथेनॉल तयार करण्यासाठी लागणारे धान्य बहुतेक अन्न महामंडळाकडूनच येते. तिथे शेतकऱ्यांनी अगोदरच आधारभूत किमतीने सरकारला विकलेले असते. त्यामुळे तिथे ही शेतकऱ्यांना फायदा होताना दिसत नाही.

### सरकारचे धोरण कसे असावे?

सर्वात प्रथम २०% इथेनॉल मिश्रित पेट्रोल वापरण्यासाठी, वाहनांचे सक्षम इंजिन तयार करावे मगच ते बाजारात आणावे. पेट्रोल पंपावर ई १०, ई २० व शुद्ध पेट्रोल असे पर्याय उपलब्ध असावेत आणि त्यानुसार त्यांचे दर असावेत.

साखर आयात, निर्याती बाबत सारखेच निश्चित, दीर्घ मुदातीचे धोरण असावे. अतिरिक्त उत्पादन असेल तर निर्यात करता आली पाहिजे. आयातीवर १०० % आयात शुल्क लावण्यापेक्षा भारतात तयार होणाऱ्या ऊस व साखरेच्या दराला मार देणार नाही असे शुल्क असावे म्हणजे पुढे तुटवडा दिसत असेल तर व्यापारी अगोदरच साखर आयात करतील. पुरवठा सुरळीत राहील. ऊसाचा व साखरेचा दर निश्चित असल्यामुळे हे सहज शक्य आहे.

सर्व इथेनॉलला एकच दर ठेवावा म्हणजे खुली स्पर्धा होईल. सरकारने कमी दारात धान्य पुरवण्यापेक्षा ते इथेनॉल कारखान्यांनी बाजारातून खरेदी करण्याचे धोरण असावे.

भारताची इंधनाची तहान भागवण्यासाठी मोठ्या प्रमाणात डॉलर खर्च करावे लागतात. इथेनॉलची व्यवस्थित निर्मिती व वापर सुरू झाल्यास परकीय चलन वाचेल म्हणून इथेनॉल निर्मिती सुरू राहिली पाहिजे. भारत प्रदूषग्रस्त झाला आहे. इथेनॉलमुळे ते काही प्रमाणात कमी होत असेल तर त्याचा स्वीकार केला पाहिजे. इथेनॉल मिश्रणामुळे पेट्रोलचे दर कमी व्हायला हवेत आणि ऊस आणि धान्याच्या शेतकऱ्यांना, इथेनॉलमधून मिळणाऱ्या फायद्याचा वाट मिळाला पाहिजे तरच या सर्व उपद्यापाचा काही उपयोग होईल नाहीतर इथेनॉल हे नेहमीच असून अडचण नसून खोळंबा ठरणार आहे.

**अनिल घनवट**
**राष्ट्रीय अध्यक्ष, स्वतंत्र भारत पक्ष**

# सिल्लोड तालुका व शहर गणेश महासंघाची कार्यकारिणी जाहीर : अध्यक्षपदी केशवराव पा.तायडे, स्वागताध्यक्ष पदी अब्दुल समीर, कार्याध्यक्षपदी नंदकिशोर सहारे, सचिव पदी सुधाकर पाटील, सुदर्शन अग्रवाल, मनोज झंवर उपाध्यक्ष पदी किशोर अग्रवाल , अक्षय मगर यांची सर्वानुमते निवड



सिल्लोड ( प्रतिनिधी ) : सिल्लोड तालुका व शहर गणेश महासंघाच्या नवीन कार्यकारिणीसाठी आ. अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय सेना भवन येथे आमदार अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीत सिल्लोड तालुका व शहर गणेश महासंघाची सर्वानुमते कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

अध्यक्षपदी केशवराव पा. तायडे स्वागताध्यक्षपदी अब्दुल समीर अब्दुल सत्तार, कार्याध्यक्षपदी नंदकिशोर सहारे, सचिव पदी सुधाकर पाटील, सुदर्शन अग्रवाल, मनोज झंवर, उपाध्यक्ष पदी किशोर अग्रवाल, अक्षय मगर, महासचिव पदी प्रशांत क्षीरसागर, सतीश ताठे ,दुर्गेश जैस्वाल , कोषाध्यक्ष पदी विशाल बावस्कर, गणेश सयाजी वाघ, संजय फरकाडे, गणेश ढोरमारे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे उर्वरित कार्यकारिणी निवड करण्यात आली. सहसचिव :- शिवा टोम्पे, राजू गौर, आशिष कटारिया, संजय मुरकुटे, मतीन देशमुख ,अमृत पटेल, रवी गायकवाड

उपाध्यक्ष :- संदिप राऊत,राहुल गव्हाणे, रितेश जैस्वाल, पप्पु जगनाडे, डॉ.संजय जामकर, पोपट सुलताने, राजेश्वर आरके

सरचिटणीस :- प्रवीण मिरकर, संजय आरके, दीपक वाघ,आशिष कुलकर्णी, पंकज जैस्वाल, अंकुश गाढवे, मनोहर आरके, राम तसेवाल

समन्वयक :- मधुकर बेंडाळे, पंजाबराव चव्हाण, नानासाहेब गायकवाड, विजय खाजेकर, बाळू पांडे, राहुल काळे, आनंद सिरसाट ,

सहकार्याध्यक्ष:- :- राजू बन्सोड, बबलू पठाण, राजुमिया देशमुख, निखिल बाकलीवाल, सचिन पाखरे, बापु काकडे, संभाजी हावळे, गोविंद लाठी,रिजवान मुल्तानी, रणजित सपकाळ,

सहसरचिटणीस:- राजू साठे, रईस मुजावर, अक्षय अग्रवाल, सचिन साळवे, सरदारसिंग लकवाल, निखिल बोरा,राहुल सपकाळ, इम्रानभाई (गुड्डू), अस्लम शेख, मॉन्टी साळुंके,

सहसचिव :- अरविंद शिंदे , गजानन चाथे,दत्ता कुडके, समाधान साळवे, फहिम पठाण, लक्ष्मण कल्याणकर, रुपेश जैस्वाल, सुनिल लांडगे, महेंद्र चौधरी, रविंद्र दानी, अमित कळम, सुभाष जाधव, एकनाथ शिंदे,सोनु जैस्वाल, जीवन सोनवने, अमोल कुदळ,राम निकम,रवी काळे, संदिप वरपे,

सह कोषाध्यक्ष :- दिनेश साळवे, लक्ष्मण जगताप, जितू आरके, गजानन महाजन, संतोष धाडगे, स्वप्नील शेळके, योगेश सनान्से, फहिम पठाण, सुनिल बन्सोड,

नियोजन प्रमुख :- प्रशांत जोशी, गणेश डकले, गौरव सहारे,शैलेश गौर, सुदाम सुडके, महेश पाटील, सखाराम अहिरे, शीतल गोसावी, मुरलीधर शेजुळ, अजित पाटील

सामाजिक कार्य प्रमुख:- कुणाल सहारे, संजय राकडे, संदिप हाडोळे, सुनिल इंगळे, दशरथ खोडके, समाधान गोंगे

निमंत्रक :- राजेंद्र ठोंबरे, सुनिल दुधे, मानसिंग राजपुत, संतोष खैरनार, शेख बाबर, प्रभाकर खोडके, शिवाजी गायकवाड, हनिफ मुल्तानी,गुलाबराव मिरगे,राहुल बोराडे, रमेश ठाकूर

महिला समिती :- दुर्गाताई पवार, मंगलाताई तायडे, रेखाताई गाढे, निकिता काळे, रेखाताई जगताप, शकुंतलाबाई बन्सोड, रेखाताई वैष्णव, मेघाताई शहा, कडुबाई सपकाळ, सविता झंवर, कल्याणीताई गौर, सुमनबाई तांगडे, दुर्गाबाई मेटे , शांताबाई कावले, मीराबाई शिंदे, कमलबाई जैस्वाल

गणेश महासंघाचे प्रमुख मार्गदर्शक आमदार अब्दुल सत्तार आहेत तर सल्लागार:- देविदास पालोदकर ( जि.प. सदस्य ), राजू बाबा काळे, सय्यद नासेर हुसेन, देविदास पा. लोखंडे (शिवसेना उपजिल्हाप्रमुख),अर्जुन पा.गाढे ( संचालक जिल्हा मध्यवर्ती बँक ), विश्वास पा. दाभाडे ( संचालक कृउबा समिती, सिल्लोड ) श्रीराम पा.महाजन, अंबादास शिंदे, अंबादास सपकाळ, श्रीमती राजश्रीताई निकम (माजी नगराध्यक्षा), डॉ. कल्पना संजय जामकर (माजी सभापती पं.स.), प्रताप प्रशाद, काकासाहेब पा. राकडे (माजी उपसभापती पं.स.सिल्लोड),विजय आबा दौड, अशोक सुर्यवंशी, डॉ.मच्छिंद्र पाखरे, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे, प्रा.मन्सूर कादरी सर (ज्येष्ठ पत्रकार),नअरूण शिंदे, नरेंद्र (बापू) पाटील, मा.जिल्हा परिषद सदस्य सौ.सीमाताई गव्हाणे, सौ.मीनाताई विनोद गायकवाड, मा.पंचायत समिती सदस्य निजाम पठाण, शेख सलीम, कासाबाई पांडुरंग गवळे, नामदेव उबाळे, सत्तार बागवान, सौ.सरिता वसंत चव्हाण, नरसिंग चव्हाण, गणेश गरुड, दामुअण्णा गव्हाणे,कौतिकराव मोरे,मधुकर गवळी,सुनिल पाटणी, रघुनाथ मोरे,हरिदास दिवटे, ईश्वर जाधव, राजाराम पाडळे,मोतीराम पाडळे,दत्तात्रय बावस्कर, गिरीश शहा, रऊफ बागवान, आसिफ बागवान , जयराम चिंचपुरे, भावराव लोखंडे, रमेश लाठी, संजय डमाळे, नानासाहेब रहाटे , मुक्ताराम गव्हाणे,

कार्यकारिणी सदस्य :- बन्सोड, कृष्णा वाघ, दिलीप वाघ, गणेश शेलार, यशवंता राजगुरु, योगेश कुदळ,संदीप कांबळे, सुनिल बन्सोड, राजु दुधे, सुरेश दुधे, विनोद शेवाळे,अंबादास दुधे, अमोल कोठाळे, मयुर सोनवणे, विशाल शेवाळे,कृष्णा चव्हाण, राजू सुरडकर, संदिप पाटील, लतेश सपकाळ,गणेश चंदणसे,सुमित पाटील, अमोल पाटील, गौरव खंडेलवाल, मनोज खंबाट, विजय पाटील, श्रीराम कुंटे, रवी पवार, गणेश बावस्कर, बंटी राका,अब्दुल बाशिद, संतोष वाघ, कैलास वाघ,अजय वाघ, सतिश पैठणकर, भावराव दुधे, रघुनाथ दुधे, योगेश कांबळे, जगन्नाथ कुदळ, उमेश पाथरे, ऋषीकेश जाधव, वैभव सुमित आंबेकर, पंढरी वरपे, विजय पांढरे, गोपीनाथ जाधव, उमेश देहाडे, पंकज दांडगे, निशांत पगारे, प्रशांत वैध,प्रमोद शिंदे, वीरेंद्र जाधव, संग्राम राजपुत, निवृत्ती सोनवणे, शिवा बावस्कर, संतोष जाधव, नितीन जाधव, संतोष राजपुत, सुनिल काकडे, रणजित राजपूत,कृष्णा सिरसाट, शिवाजी बडक, दिपक बडक, रमेश इंडोले, विजय जंजाळ, देवा मोरे,दीपक साळवे,दिलीप जाधव, अजिनाथ पांढरे,पवन इंगळे,सचिन काकडे,दीपक पालोदकर, राम काकडे, तात्याराव गोराडे, गोपाल राजपुत, रामू सुरडकर, दिपक लोखंडे

# नगरेश्वर मंदिरात लाखो लिंगार्चन; भाविकांची उत्स्फूर्त गर्दी

सचिन रायपत्रीवार

जिंतूर : प्रतिनिधी

श्रावण महिन्याचे औचित्य साधत जिंतूर शहरातील प्राचीन श्री नगरेश्वर मंदिरात मागील तीस वर्षापासून परम पूज्य महेश चैतन्य स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाने पवित्र सानिध्यामध्ये दररोज मोठ्या भक्तिभावाने लिंगार्चन पूजेचे आयोजन करण्यात येत असून, या धार्मिक उपक्रमाला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे...




समाजातील १८ वा अध्याय भगवद्गीता मुखोद्गत असणाऱ्या महिला पुरुषांचा व मुलांचा सत्कार करण्यात आला..

आर्य वैश्य कोमटी समाजाच्या वतीने आयोजित या उपक्रमात दररोज महापूजा, 'ॐ नमः शिवाय' मंत्रजप, अभिषेक, लिंगार्चन व महाआरती पार पडत असून मंदिर परिसर शिवभक्तांच्या जयघोषाने दुमदुमून जात आहे..

श्रावण महिना हा भगवान शंकराच्या उपासनेसाठी अत्यंत पवित्र मानला जातो...

यानिमित्ताने मंदिरात दररोज भाविक उपस्थितीत लिंगार्चन पूजेत सहभागी होत आहेत...

तसेच नगरेश्वर महादेव यांचा 26 वा स्थापना दिवस मोठ्या थाटामाटा मध्ये साजरा करण्यात आला..विशेष म्हणजे महिला भक्तांचा सहभाग लक्षणीय असून सकाळपासूनच मंदिर परिसरात दर्शन, पूजा व आरतीसाठी भाविकांच्या रांगा लागलेल्या दिसत आहेत.

आर्य वैश्य कोमटी समाजाच्या वतीने दरवर्षी श्रावण महिन्यात हा धार्मिक उपक्रम सातत्याने राबविला जातो. समाजातील पदाधिकारी व कार्यकर्ते भाविकांसाठी आवश्यक व्यवस्था करत असून, श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माचा संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळत आहे. श्रावणातील प्रत्येक सोमवारी तसेच विशेष तिथींना भाविकांची संख्या अधिक वाढत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. श्रावण महिन्यामध्ये होणाऱ्या लिंग अर्चनाचे महत्त्व ॲड योगेश उन्हाळे यांनी सांगितले..

**दरवर्षीश्रावण महिन्यात भगवान शिवाची उपासना करण्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे. मातीचे शिवलिंग तयार करून त्याचे विधिवत पूजन व लिंगार्चन केल्याने भक्तिभाव, श्रद्धा आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण होते हा धार्मिक कार्यक्रम पाहण्यासाठी शहरातील अबाल वृद्ध व्यापारी , संत महंत, वारकरी संप्रदायाचे नामवंत महाराज मंत्र,राजकीय नेते दर्शनासाठी महादेवाचा कृपाशीर्वाद घेत आहेत...**

***ॲड योगेश उन्हाळे जिंतूर**

नगरेश्वर मंदिरातील या धार्मिक वातावरणामुळे संपूर्ण शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, श्रावण महिन्यातील लिंगार्चन पूजेमुळे भाविकांना अध्यात्मिक समाधान लाभत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. मंदिरात सुरू असलेला 'ॐ नमः शिवाय' मंत्रजप आणि सामूहिक आरतीमुळे परिसरात भक्तिरसाची अनुभूती होत असून, श्रावण महिन्याच्या अखेरपर्यंत हा उपक्रम नियमितपणे सुरू राहणार आहे.

नित्यनियमित विष्णुसहस्त्रनाम शिवमहिम्नस्तोत्र व भगवद्गीतेचा पाठ तसेच संध्याकाळी हरी ओम नमः शिवाय चा जप व हरिपाठ यामुळे शहरांमध्ये नगरेश्वर मंदिराला एक वेगळे आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झालेले आहे...

दरवर्षी श्रावण महिन्यात भगवान शिवाची उपासना करण्याला विशेष धार्मिक महत्त्व आहे. मातीचे शिवलिंग तयार करून त्याचे विधिवत पूजन व लिंगार्चन केल्याने भक्तिभाव, श्रद्धा आणि आध्यात्मिक वातावरण निर्माण होते...

# अश्वमेध दहीहंडीत गोविंदांचा थरार; संभाजीनगरी दुमदुमली

## महात्मा फुले चौकात 11 गोविंदा पथकांची चुरस; 'कृष्ण केसरी'ने पटकावले विजेतेपद, 33 वर्षांची परंपरा कायम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** संभाजीपेठेतील महात्मा फुले चौकात शनिवारी (दि. ५) सायंकाळी झालेल्या 'अश्वमेध दहीहंडी महोत्सवा'त गोविंदांच्या थरारक कामगिरीने संभाजीनगरी दुमदुमून गेली. स्थायी समिती सभापती अनिलभैय्या मकरीये यांच्या वतीने आयोजित या महोत्सवात ११ गोविंदा पथकांनी सहभाग घेतला. ढोल-ताशांचा कडकडाट, गोविंदांचा उत्साह आणि दहीहंडी फोडण्यासाठी रंगलेली चुरस यामुळे महात्मा फुले चौक परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. 'कृष्ण केसरी गोविंदा पथका'ने दमदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले.

गेल्या ३३ वर्षांपासून सुरू असलेली अश्वमेध दहीहंडीची परंपरा यंदाही उत्साहात कायम राहिली. विविध गोविंदा पथकांनी मानवी मनोरे रचत दहीहंडी फोडण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. उंचच उंच थर रचताना गोविंदांचे कौशल्य, जिद्द आणि सांघिक समन्वय पाहायला मिळाला. प्रत्येक प्रयत्नावेळी उपस्थित नागरिकांनी टाळ्यांचा कडकडाट आणि घोषणांनी गोविंदांचा उत्साह वाढविला.



महोत्सवाला स्टार प्लसवरील 'मान के हम यार नहीं' या मालिकेतील अभिनेत्री प्रिया शिंदे यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची रंगत आणखी वाढली. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते.

महोत्सवाला कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड, महापौर समीर राजूरकर, माजी महापौर बापू घडामोडे, नगरसेवक रवी कावडे, पदमसिंह राजपूत, नगरसेविका अमृता पालकर, कीर्ती शिंदे, दीपक खोतकर, राजू शिंदे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुन्या पेन्शन साठी शालेय कर्मचारी काढला मूक मोर्चा; जिल्हाधिकारी कार्यालयावर केले आंदोलन




हिंदू प्रकाश वार्ता / अशोक पवार.

**परभणी:-** गेली अनेक वर्षापासून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कुठलीच पेन्शन लागू नसल्याने लागू नसलेल्या शालेय कर्मचाऱ्यांनी आंदोलन पुकारले असून महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघ जिल्हा शाखा परभणी च्या वतीने शिक्षक दिनाचे औचित्य साधून दिनांक 5 सप्टेंबर शनिवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढून महात्मा फुले यांच्या पुतळ्यापासून मूक मोर्चाला सुरुवात केली

राज्यातील खाजगी शाळेतील एक नोव्हेंबर 2005 पूर्वी नियुक्ती व 2005 नंतर शंभर टक्के अनुदानावर असलेल्या शालेय कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचे रणसिंग फुंकल आहे.

दिनांक एक सप्टेंबर मंगळवार रोजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती बांधून शासनाच्या या धोरणाचा निषेध केला होता शिक्षक दिनाच्या औचित्य साधून दिनांक 5 सप्टेंबर शनिवार रोजी जिल्हाधिक कार्यालयावर मूक मोर्चा काढण्यात आला या मोर्चाची सुरुवात महात्मा फुले पुतळ्यापासून करण्यात आली छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे मोर्चा जिल्हाधिकार्यालयापर्यंत नेण्यात आला या मोर्चाच्या प्रमुख मागण्या जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीबाबत शासनास ठोस निर्णय घेतला नाही त्यामुळे आंदोलनाचे स्वरूप तीव्र करण्यात आले असून मागणीची दखल न घेतल्यास 28 सप्टेंबर पासून मुंबई येथे आझाद मैदानावर सहकुटुंब सहपरिवार आंदोलन करण्यात येणार असल्याचे तसेच आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला मूक मोर्चाद्वारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबितमागण्याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी या भव्य दिव्य मोर्च्याच्या आयोजन करण्यात आले होते त्यामुळे मूक मोर्चामध्ये सहभागी मुख्याध्यापक संघ मराठवाडा शिक्षक संघ शिक्षक परिषद विनाअन कीर्ती समिती आदींनी पाठिंबा दिला मोर्चा यशस्वी करण्यासाठी अशोक रसाळ बीबी शेंडगे एस आर कदम बीबी अंभोरे शांती लिंग काळे धीरजपुर राजकुमार धबडे बी.जी. मोरे एस पासपोर्ट दिगंबर मोरे बीएम भांगे उत्तम केंद्रे अभिजीत धानोरकर नजीर कदम भंडारे शहाणे राठोड भांबळे वाघमारे बाबा सोनटक्के माणिक कदम हरेश्वर पाटील पतंगे वाय आर पाते जाधव भिसे शिंदे काळे नामपल्ले कांदे केज गिरे गाडे पिंपळे इमडे आधी इत्यादी कर्मचाऱ्यांनी या मूक मोर्चामध्ये सहभाग नोंदवला होता.

# शिक्षक दिनी विद्यार्थी स्वयंशासन दिन उपक्रमाने साजरा

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.६ सप्टेंबर

छात्र अध्यापक अध्यापिका यांनी स्वयंशासन दिनानिमित अध्यापन व शालेय कामकाज सांभाळून आपल्या शिक्षक गुरू यांचा केला सन्मान. जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिनी विद्यार्थी यांनी छात्र अध्यापक व अध्यापिका भूमिका पार पडून साजरा केला. मुख्याध्यापिका म्हणून ज्योत्स्ना पाटील,उपमुख्याध्यापक दुर्गा वारंगणे,गायत्री मंडवे,पर्यवेक्षक देवयानी घन

छात्र अध्यापक वैभव ढगे ,आदित्य पवार आदि यांनी कामकाज पाहिले.

परिपाठ पासून उपक्रमाला डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा प्रतिमा अभिवादन करून उपक्रम सुरू करण्यात आला.



दिवसभर सर्व छात्र अध्यापक यांनी अध्यापन केले व सर्व शालेय कामकाज विद्यार्थी अध्यापक यांनी पार पाडले. उत्कृष्ट छात्र अध्यापक म्हणून गायत्री बावस्कर व आदित्य पवार यांची निवड करण्यात आली.स्वयंसेवक गोपाल जुनघरे कामकाज पाहिले.

यावेळी सर्व छात्र अध्यापक यांनी आपल्या गुरूंचा सत्कार करीत भेट देऊन सन्मान केला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून समाजसेवक संजय शहापूरकर,शिक्षणप्रेमी सदस्य तथा कृषी भूषण अरुण सोहनी यांची प्रमुख उपस्थित होती.यावेळी विद्यार्थी यांनी आपल्या शिक्षक यांचे प्रति व आज आलेल्या अनुभव कथन केले,सत्कार उत्तर देताना भास्कर चौधरी व दौलतसिंग परदेशी यांनी शिक्षकांचे जीवनातील स्थान तसेच विद्यार्थी अध्यापक यांचे कौतुक प्रमुख पाहुणे यांनी केले यावेळी मुख्याध्यापक दादाराव राठोड,शिक्षक शिवाजी नवले,विद्याधर बागुल,राजेंद्र उंबरकर,तुकाराम पायाघन,संगीता सोनवणे,जया वाघ, संतोष भारद्वाज,नंदिनी खेडकर,सचिन ढगे,शिवराम आगे,सोनू देसले सेवक,प्रवीण चवळे यांचे सह सर्व छात्र अध्यापक अध्यापिका ,विद्यार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्र संचलन गायत्री बावस्कर हिने केले तर आभार देवयानी मिसाळ हिने मानले तसेच आनंदाची बाब म्हणजे गुणवत्ता पूर्ण शाळा म्हणून जिल्हा परिषद प्रशालेचा जिल्हा परिषद छ.संभाजीनगर येथे जिल्हा परिषद अध्यक्ष,शिक्षण सभापती,मुख्यकार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी व पदाधिकारी यांचे हस्ते गौरविण्यात आले आहे.

# तिसगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक दिन उत्साहात

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**तिसगाव :** एचजी फाउंडेशन आणि संवेदना डेव्हलपमेंट सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या सीएसआर प्रकल्पांतर्गत तिसगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.



कार्यक्रमास संवेदना डेव्हलपमेंट सोसायटीचे व्यवस्थापक हरीश लालकोटसर, कार्यक्रम समन्वयक सचिन लिमकर, सचिन डहाळे, इरशाद सय्यद, मेराज सय्यद, सारिका गवळी तसेच शाळेतील शिक्षकवृंद उपस्थित होते.

शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांच्या योगदानाचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान मोलाचे असून, त्यांच्या कार्याप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# शेतकऱ्यांना दुष्काळी उपाययोजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी तातडीने अहवाल सादर करा : जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

हिंदु प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**परभणी, :** जिल्ह्यात जून-जुलै महिन्यात झालेला पाऊस, पावसाचे दिवस, प्रत्यक्ष पडलेला पाऊस तसेच ऑगस्ट महिन्यातील पावसाची स्थिती आणि पिकांची सद्यस्थिती यांचा शास्त्रीय पद्धतीने विचार करून दुष्काळसदृश परिस्थितीचा वस्तुनिष्ठ अहवाल तयार करावा. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा 'ट्रिगर-१' मध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने आवश्यक माहिती संकलित करून तातडीने शासनास अहवाल सादर करण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात (दि.४) आयोजित जिल्हा दुष्काळ देखरेख समितीच्या बैठकीत जिल्ह्यातील पावसाची स्थिती, पिकांची सद्यस्थिती, जलसाठे तसेच सिंचन व्यवस्थेचा आढावा घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी बोलत होते.

जिल्ह्यात ३० जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीचा अपवाद वगळता जून-जुलै कालावधीत समाधानकारक पाऊस झालेला नाही. पावसातील मोठा खंड, प्रत्यक्ष पावसाचे प्रमाण आणि त्याचा पिकांवर झालेला परिणाम विचारात घेतल्यास जिल्ह्यातील बहुतांश गावांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.

जिल्ह्यात सध्या काही प्रमाणात उभी असलेली पिके प्रामुख्याने संरक्षित सिंचनामुळे टिकून असली, तरी मोठ्या प्रमाणावर पिके वाळत आहेत. पिके ऐन फळधारणेच्या अवस्थेत असताना पावसाअभावी वाळत असल्याने त्याचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर पावसाची शास्त्रीय आकडेवारी, पिकांची सद्यस्थिती आणि पावसातील खंड याबाबत आवश्यक माहिती संकलित करून शासनास अहवाल सादर करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी चव्हाण यांनी स्पष्ट केले.

खरीप पिके वाचविण्यासाठी जलसाठ्यांचा नियोजनबद्ध वापर

सध्या रब्बी हंगामापेक्षा उभी असलेली खरीप पिके वाचविण्यास जिल्हा प्रशासनाचे प्राधान्य राहणार आहे. पुढील आठ दिवसांत जलसंपदा विभागाच्या वितरिकांमधून आवश्यकतेनुसार पाणी सोडण्याचे नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. जायकवाडी प्रकल्पाच्या माध्यमातून परभणी जिल्ह्यात सुमारे ९७ हजार ४०० हेक्टर, तर येलदरी प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे १६ हजार १४२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. मात्र येलदरी धरणामध्ये सिंचनासाठी पुरेसा पाणीसाठा उपलब्ध नसल्याने उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने व नियोजनबद्ध पद्धतीने वापर करण्याचे निर्देश देण्यात आले.

यासोबतच जायकवाडी, येलदरी, निम्न दुधना व करपरा प्रकल्पांतील उपलब्ध पाण्याचा आवश्यकतेनुसार उपयोग करून खरीप पिके वाचविण्यासाठी नियोजन करावे, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

सर्व विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांचा 'ट्रिगर-१' मध्ये जास्तीत जास्त प्रमाणात समावेश होण्यासाठी महसूल, कृषी, जलसंपदा, जलसंधारण, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पाणीपुरवठा तसेच संबंधित विभागांनी योग्य समन्वय साधून आवश्यक माहिती एकत्रित करावी आणि त्याआधारे वस्तुनिष्ठ अहवाल तयार करावा, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

# पावसाने दगा दिल्याने शेतकरी हवालदिल पिकावर फिरवला नांगर





हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी:-** यावर्षी सुरुवातीपासूनच निसर्ग राजा ने खरीप हंगामामध्ये सातत्याने शेतकऱ्यांना दगा दिल्यामुळे पाथरी तालुक्यातील शेतकऱ्यांवर उभ्या पिकावर नांगर फिरवण्याची वेळ आली आहे यामध्ये वाघाळा परिसरातील शेतकऱ्यांनी ची पिके मोडून काढली असून कापसाच्या शेतात जनावरे सोडल्याने दुष्काळी परिस्थितीची तीव्रता स्पष्ट निर्माण झाली आहे यामध्ये वाघाळा येथील शेतकरी मदन घुमरे यांनी जुलै महिन्यात झालेल्या पावसानंतर शिवारातील गट क्रमांक 175 मधील दीड एकर शेतावर मुगाची पेरणी केली होती मात्र त्यानंतर पावसाने पिकाची वाढ खुंटली आणि मूग पिकाचे गेल्याने शनिवारी त्यांनी बैल अवतारच्या साह्याने शेतातील पिकावर नांगर फिरवले याच गावातील दुसऱ्या शेतकऱ्यांनी सुद्धा शिवहार वाघमारे यांनी गट क्रमांक 275 मधील आठ एकर कापूस पिकाचे शेतामध्ये जनावरे सोडले आहेत सुमारे 15 एकर क्षेत्रात त्यांनी यापूर्वीच नांगर फिरवला असल्याने व शेतकाळे करून ठेवल्याने पाथरी तालुक्यात यंदा दुष्काळाची तीव्र चाहूल लागली असून पावसाअभावी खरीप पिकातील पिके करपून जात आहेत आता तोंडाशी आलेला घास हंगाम वाया जात असल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून शासनाने तातडीने या परिस्थितीचे पाहणी करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदतीचा हात द्यावा अशी मागणी परिसरातील शेतकऱ्याकडून केली जात आहे.

# अश्लील छायाचित्राचा धाक दाखवून विवाहितेवर अत्याचार; गुन्हा दाखल

## पिढीतेच्या पती व मुलीला जीव मारण्याची धमकी

हिंदू प्रकाश वार्ता

**परभणी:-** ओळखीचा फायदा घेऊन जवळीकता करत गोड गोड बोलून मैत्री अधिक घट्ट झाल्यानंतर पिडिते सोबत अश्लील फोटो व व्हिडिओच्या माध्यमातून बदनामी करण्याच्या हेतूने तसेच पती मुलीला जीवे मारण्याची धमकी देत एका विवाहितेसोबत वारंवार अत्याचार केल्याच्या तक्रारीवरून पोहे टाकळी येथील एका आरोपीच्या विरोधात पाथरी पोलीस ठाण्यात आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे अधिक माहिती अशी की 5 सप्टेंबर शनिवार रोजी पाथरी पोलीस ठाण्यात एका पिढीत विवाहित महिलेने दिलेल्या तक्रारीवरून सन 2017 मध्ये नातेवाईक महिलेच्या माध्यमातून या महिलेची पात्री तालुक्यातील पोहे टाकळी येथील हमीद शेरखान नावाच्या व्यक्तीसोबत ओळख झाली व या ओळखीचे रूपांतर या दोघांमध्ये जवळीकता येत मैत्रीमध्ये झाले त्यानंतर 30 जानेवारी 2017 रोजी रामडा तलाव परिसरातील गार्डनमध्ये भेटण्याच्या बहाण्याने बोलवून आरोपीने महिलेसोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला असून यावेळी आरोपीने तिचे फोटो व्हिडिओ काढण्याचे तक्रार नमूद करण्यात आले आहे त्यानंतर हे फोटो व्हिडिओ व्हाट्सअप वर सोशल मीडियावर पाठवून बदनामी करण्याची धमकी देत आरोपीने महिलेसोबत वारंवार संपर्क साधत असल्याचे महिलेने म्हटले आहे तसेच पती व मुलीला जीव मारण्याचा धमकी देऊन विविध ठिकाणी भेटण्यास भाग पाडण्याचा ही आरोप करण्यात आला आहे पीडित महिला मानसिक ताण-तणावात गेल्यानंतर तिच्यावर वैद्यकीय उपचार चालू असल्याचे तक्रारीत नमूद केले असून या परिस्थितीचा गैरफायदा घेत आरोपीने व वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप पीडित महिले करून करण्यात आला आहे आरोपीने महिलेला लग्न करण्याचे आमिष दाखवून लग्न करण्याच्या आश्वासने दिले होते मात्र त्यांनी आपल्याला न सांगता दुसरा विवाह केल्याचे समजल्यानंतर महिलेने त्याच्याकडे जॉब विचारला असता त्याने धमकी दिल्याची तक्रारीत म्हटले आहे याप्रकरणी पाथरी पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

## सोयगाव तालुक्यातील नांदगाव तांड्याचा आदर्श उपक्रम: 'एक गाव एक गणपती व एक देवी'सह डीजेबंदी व दारूबंदीचा ऐतिहासिक निर्णय

# सोयगाव तालुक्यातील इतर गावांनी नांदगाव तांड्याचा आदर्श घ्यावा - स. पो.नि.दिनकर गोरे

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव दि.५ सप्टेंबर - सणांमध्ये डीजेऐवजी फक्त पारंपारिक ढोल-ताशांचा घुमणार गजर दारूबंदीचा ठराव एकमुखाने मंजूर; गावाला आदर्शाकडे नेण्याचा ग्रामस्थांचा संकल्प. तरुण वर्ग आणि ग्रामस्थांचा सामाजिक सलोख्यासाठी पुढाकार,सोयगाव तालुक्यातील नांदगाव तांडा येथे सामाजिक सलोखा, शांतता आणि सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या उद्देशाने सर्व ग्रामस्थांनी एकत्र येत 'एक गाव एक गणपती', 'एक गाव एक देवी' आणि 'एक गाव एक उत्सव' साजरा करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. एवढेच नव्हे तर, गावाला आदर्शाकडे नेण्यासाठी डीजेवर पूर्णपणे बंदी घालून सण-उत्सव फक्त पारंपारिक ढोल-ताशांच्या गजरात साजरे करणे तसेच संपूर्ण गावात एकमुखाने 'दारूबंदी' करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव या बैठकीत मंजूर करण्यात आला.

सोयगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांच्या मुख्य उपस्थितीत व अध्यक्षतेखाली नांदगाव तांडा येथे ग्रामस्थांची विशेष नियोजनबद्ध सभा पार पडली. या सभेला गावातील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ज्येष्ठ नागरिक, महिला व विशेषतः तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

डीजेबंदी अन् दारूबंदीचा धाडसी निर्णय

सण-उत्सवाच्या काळात होणारा अनावश्यक खर्च, ध्वनी प्रदूषण आणि संभाव्य वादविवाद टाळण्यासाठी गावातून डीजे संस्कृती हद्दपार करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतला. आगामी गणेशोत्सव व नवरात्रोत्सव हे सण केवळ ढोल-ताशा आणि पारंपारिक वाद्यांच्या गजरातच अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरे केले जातील. याच वेळी गावाच्या शाश्वत विकासासाठी व तरुण पिढीचे आयुष्य समृद्ध करण्यासाठी गावात पूर्णपणे 'दारूबंदी' करण्याचा ठराव एकमुखाने संमत करण्यात आला. तसेच राम मंदिर निर्माण आणि गावाच्या सर्वांगीण विकासाबाबत नियोजनबद्ध पावले उचलण्याचा संकल्पही ग्रामस्थांनी केला.



इतर गावांनी नांदगाव तांड्याचा आदर्श घ्यावा: सपोनि दिनकर गोरे

या प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर गोरे यांनी नांदगाव तांड्यातील ग्रामस्थ व विशेषतः तरुणांच्या या पुरोगामी आणि सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

"नांदगाव तांडा गावाने घेतलेला हा निर्णय अत्यंत कौतुकास्पद व दिशादर्शक आहे. यामुळे गावात शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि बंधुभाव वृद्धिंगत होईल. सोयगाव तालुक्यातील सर्वच गावांनी नांदगाव तांड्याचा हा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून आपल्या गावातही 'एक गाव एक गणपती' व 'एक गाव एक देवी' ही संकल्पना राबवावी."

दिनकर गोरे सहाय्यक पोलीस निरीक्षक, सोयगाव

या बैठकीस गावातील सर्व लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत सरपंच उपसरपंच पोलीस पाटील तंटामुक्ती अध्यक्ष सदस्य, पोलीस कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. नांदगाव तांडा ग्रामस्थांनी घेतलेल्या या आदर्श व एकमुखी निर्णयाचे संपूर्ण सोयगाव तालुक्यातून सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

# कत्तलीसाठी डांबून ठेवलेल्या 13 गोवंश जनावरांची सुटका; वैजापूर तालुक्यात ग्रामीण पोलिसांची कारवाई; 2 लाख 8 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** कत्तलीच्या उद्देशाने गोवंश जनावरांना दाटीवाटीने बांधून, चारा-पाण्याविना डांबून ठेवल्याची माहिती मिळताच छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलिसांनी वैजापूर तालुक्यात कारवाई केली. या कारवाईत १३ गोवंश जिवंत जनावरांची सुटका करून २ लाख ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, अवैध कत्तल, गोमांसाची तस्करी तसेच प्राण्यांवरील क्रूरतेविरोधात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या गुन्ह्यांवर 'झिरो टॉलरन्स' धोरण स्वीकारण्यात आले असून, गुप्त माहितीच्या आधारे छापेमारी, नाकाबंदी आणि कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आल्या आहेत.

या अंतर्गत ५ सप्टेंबर रोजी वैजापूर तालुक्यातील मौजे खंडाळा येथील शेत गट क्रमांक १२७ मधील मोकळ्या जागेवर कारवाई करण्यात आली. कत्तलीच्या उद्देशाने गोवंश जनावरांना दाटीवाटीने दोरीने बांधून, त्यांना चारा-पाणी न देता क्रूरपणे डांबून ठेवल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५८०/२०२६ दाखल करण्यात आला आहे. प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० मधील कलम



११(१)(ई) व ११(१)(एच) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, पुढील तपास वैजापूर पोलीस करीत आहेत.

या कारवाईत १३ गोवंश जनावरे, अंदाजे २ लाख ८ हजार रुपये किमतीची, जप्त करण्यात आली.

पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी सांगितले की, गोवंश जनावरांची बेकायदेशीर वाहतूक, गोमांस तस्करी आणि प्राण्यांवरील क्रूरतेविरोधात ग्रामीण पोलिसांची कारवाई सुरूच राहणार आहे. अशा गुन्ह्यांत सहभागी असलेल्या व्यक्तींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी, उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे, प्रभारी अधिकारी तथा उपअधीक्षक विनय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर ढाकणे, पोलीस हवालदार विशाल पडळकर, पोलीस कॉन्स्टेबल केरे आणि होमगार्ड आवारे यांनी केली.

# माँसाहेब मीनाताई ठाकरे यांना स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

## माँसाहेब अमर रहे'च्या घोषणांनी शिवसेना भवन दणाणले

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** तमाम शिवसैनिकांच्या लाडक्या माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त शिवसेना भवन येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित शिवसैनिकांनी माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या स्मृतींना अभिवादन केले. 'अमर रहे, अमर रहे... माँसाहेब अमर रहे', 'माँसाहेब मीनाताई ठाकरे जिंदाबाद', 'शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो', अशा घोषणांनी शिवसेना भवन परिसर दणाणून गेला.



यावेळी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, सहसंपर्कप्रमुख अनिल चोरडिया, उपजिल्हाप्रमुख अरविंद धीवर, हिरालाल सलामपुरे, श्रीरंग आमटे पाटील, संतोष जेजुरकर, संतोष खेडके, विधानसभा संघटक गोपाळ कुलकर्णी, गिरीश चपळगावकर, शहरप्रमुख दिग्विजय शेरखाने, नगरसेवक सचिन खैरे, उपशहरप्रमुख विजय सूर्यवंशी, ज्येष्ठ शिवसैनिक शिरीष सावजी, संतोष चंदन यांच्यासह महिला आघाडीच्या दुर्गा भाटी, आशा दातार, सुकन्या भोसले, सुनंदा खरात, रेखा शहा, मीरा देशपांडे, नलिनी बाहेती, अरुणा भाटी, सुनीता सोनवणे, राजश्री पोफळे, सीमा गवळी, छाया देवराज, रूपाली मुंदडा, कविता मठपती, लता शंकरपाळ आदी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघातर्फे ६५ शिक्षकांचा सन्मान

## शिक्षकांचे राष्ट्रनिर्माणातील योगदान मोलाचे; समर्थ राममंदिरात शिक्षक दिन उत्साहात साजरा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने शहरातील ६५ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. समर्थ राममंदिर येथे आयोजित या सन्मान सोहळ्याला शिक्षकांसह त्यांच्या कुटुंबीयांची मोठी उपस्थिती होती.



यावेळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक म्हणाले की, भारतात पूर्वी गुरुकुल पद्धतीने शिक्षण देण्याची समृद्ध परंपरा होती. स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत शिक्षकांना 'गुरुजी' म्हणून आदराने संबोधले जात असे. विविध राजवटी आणि ब्रिटिश काळात ही शैक्षणिक परंपरा खिळखिळी झाली. मात्र, स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षकांनी पुन्हा शिक्षणव्यवस्थेचा भक्कम पाया उभारत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य केले. भारताला विश्वगुरू बनविण्यात शिक्षकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. याच भावनेतून सामाजिक उत्तरदायित्वाच्या भूमिकेतून हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी संजीव सोनार यांनी शिक्षकांनी विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी दिलेले योगदान अधोरेखित केले. शिक्षणाच्या क्षेत्रात भारताने मोठी प्रगती केली असून, या प्रगतीत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले.

अध्यक्षीय भाषणात वेदशास्त्रसंपन्न दुर्गादास मुळे गुरुजी यांनी जुन्या काळापासून आधुनिक शिक्षणव्यवस्थेपर्यंतचा प्रवास उलगडला. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी आणि करपात्री महाराज यांच्याशी संबंधित प्रसंग सांगत त्यांनी पाच वेदशाळा उभारण्यामागील किस्साही उपस्थितांसमोर मांडला. तसेच शिक्षकांना मार्गदर्शन करत त्यांच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता नगरकर व सुरेखा पारवेकर यांनी केले. महिला जिल्हाध्यक्षा सुचेता पालोदकर यांनी आभार मानले. यावेळी गुजराती शाळेचे अध्यक्ष राजेश मेहता उपस्थित होते. दुर्गादास मुळे गुरुजी यांचा सत्कार जिल्हाध्यक्ष सुधीर नाईक व सुचेता पालोदकर यांच्या हस्ते करण्यात आला. संजीव सोनार व राजेश मेहता यांचे स्वागत दीपक कुलकर्णी, दिलीप लाड, वैभव जोशी व मोहन काळे यांनी केले. कार्यक्रमास अंजली देशपांडे, सुभाष जोशी, स्मिता जोशी, छाया खोचे, कालिदास त्रिवेदी, सीमा नांदापूरकर, ॲड. अश्विनी कुलकर्णी, प्रसाद लिगदे, अनिल देशपांडे यांच्यासह महासंघाचे पदाधिकारी, सन्मानार्थी शिक्षक व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

# सोमवारी संभाजीनगरीत भव्य कावड यात्रा : ५०० कावडधारी, १०० हून अधिक कलाकार अन् हजारो शिवभक्तांचा सहभाग

**हिंदू प्रकाशवार्ता** : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भगवान महादेवावरील श्रद्धा, भक्ती आणि धार्मिक-सांस्कृतिक परंपरेचा जागर करणारी भव्य कावड यात्रा सोमवारी (दि. ७) संभाजीनगरीत निघणार आहे. शिवशंभो प्रतिष्ठान आणि सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित या यात्रेत सुमारे ५०० कावडधारी, १०० हून अधिक कलाकार आणि हजारो शिवभक्त सहभागी होणार आहेत. यंदाची यात्रा मागील वर्षाच्या तुलनेत अधिक भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली असून, 'हर हर महादेव'च्या जयघोषाने शहर दुमदुमणार आहे. संयोजक संजय केनेकर यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

जाधववाडी येथील श्री रामेश्वर महादेव मंदिरात सोमवारी सायंकाळी ४ वाजता अभिषेक करून यात्रेला प्रारंभ होईल. श्री क्षेत्र सरला बेट संस्थानचे महंत सद्गुरू श्री रामगिरी महाराज यांच्या शुभहस्ते यात्रेचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

भव्य महादेवाची मूर्ती ठरणार मुख्य आकर्षण

यात्रेतील प्रमुख आकर्षण भगवान महादेवाची भव्य आणि आकर्षक मूर्ती असणार आहे. विविध भजनी मंडळे, सांस्कृतिक पथके, कला मंडळे आणि पारंपरिक वाद्यपथकांच्या सादरीकरणामुळे यात्रेची शोभा वाढणार आहे. विद्यार्थी आणि पालकवर्गासह शहरातील विविध समाजघटकही यात्रेत



सहभागी होणार आहेत.

प्रमुख मार्गांवरून कावड यात्रा

श्री रामेश्वर महादेव मंदिरातून निघणारी यात्रा टी.व्ही. सेंटर चौक, गणेश कॉलनी, पंचायत समिती, चांदणी चौक, चेलीपुरा, शहागंज, गुलमंडी, संभाजी पेठ, महात्मा फुले चौक, महात्मा गांधी पुतळा आणि सिटी चौक पोलीस ठाणे मार्गे खडकेश्वर महादेव मंदिरात पोहोचेल. येथे कावडीतून आणलेल्या पवित्र जलाने भगवान महादेवाचा अभिषेक करण्यात येणार असून, त्यानंतर यात्रेची सांगता होईल.


भाविकांसाठी सुविधा; सुरक्षिततेचे नियोजन

यात्रेच्या मार्गावर स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली असून, भाविकांसाठी पिण्याचे पाणी, चहा, अल्पोपहार आणि आवश्यक वैद्यकीय मदतीची व्यवस्था करण्यात आली आहे. गर्दी नियंत्रण, भाविकांची सुरक्षितता आणि वाहतूक व्यवस्थेबाबतही नियोजन करण्यात आले आहे. विविध संस्था, मंडळे आणि नागरिकांकडून यात्रेचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात येणार आहे.

# डीजेच्या कर्कश आवाजाला भाजपचा ठाम विरोध : शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांच्या अध्यक्षतेखाली बीड बायपास येथील मंथन हॉलमध्ये शांतता समितीची बैठक झाली. या बैठकीस भाजपला निमंत्रण होते; मात्र पक्षाची पूर्वनियोजित जिल्हा कार्यकारिणीची बैठक असल्याने भाजपचा प्रतिनिधी बैठकीस उपस्थित राहू शकला नाही. दरम्यान, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी पक्षाची भूमिका आणि गणेशोत्सवाबाबतच्या मागण्या पोलीस आयुक्तांना लेखी निवेदनाद्वारे स्पष्ट केल्या.



गणेशोत्सव तसेच आगामी सण-उत्सव भारतीय संस्कृती व परंपरेनुसार मंगलमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरे व्हावेत, अशी भूमिका शितोळे यांनी मांडली. उत्सवामुळे नागरिक, व्यापारी, रुग्ण, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्याची मागणी त्यांनी केली.

शहरातील वाढत्या डीजे संस्कृतीला भाजपचा ठाम विरोध असून, डीजेच्या कर्कश आवाजामुळे होणाऱ्या ध्वनी प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण ठेवावे आणि ध्वनीमर्यादेचे नियम काटेकोरपणे लागू करावेत, अशी मागणी लेखी निवेदनातून करण्यात आली आहे.

गणेशोत्सव शांततामय, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, तसेच सामाजिक सलोखा, नागरिकांची सुरक्षितता आणि सार्वजनिक सोयींना प्राधान्य द्यावे, अशी मागणीही करण्यात आली.

# नागनाथ फटाले पत्रकारिता जीवन साधना गौरव पुरस्कार विजय कुवळेकरांना जाहीर

## 22 ला समारंभपूर्वक वितरण, मानकन्हैया ट्रस्टची पत्रपरिषद

**छत्रपती संभाजीनगर:** मानकन्हैय्या ट्रस्टच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीला नागनाथ फटाले पत्रकारिता जीवनसाधना गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पहिल्या पुरस्कारासाठी ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांची निवड करण्यात आली आहे. नांव निश्चित केले आहे. अशी माहिती श्री नागनाथ फटाले यांची कन्या डॉ. सौ. सुधा प्रकाश कांकरिया यांनी दिली. आय. एम. ए. सभागृहात २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.१५ वा. राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान सोहळा असून, प्रमुख अतिथी म्हणून महापौर समीर राजूरकर उपस्थित राहतील, अशी माहिती फटाले यांच्या कन्या डॉ. सुधाताई





कांकरिया यांनी रविवारी, ६ रोजी पत्रपरिषदेत दिली. यावेळी डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. हेमंत फटाले, प्रशांत फटाले उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार नागनाथ फटाले यांनी ९० व्या वर्षात पदार्पण केले आहे. पत्रकारिता क्षेत्रात त्यांनी ६० वर्षांहून अधिक काळ महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. पत्रकारितेसह सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व ज्योतिषशास्त्र विषयांवर त्यांचा गाढा अभ्यास आहे. ग्राहक चळवळ, ग्रंथालय चळवळ, हमाल पंचायत चळवळ आदी अनेक सामाजिक चळवळीचे ते जनक आहेत. त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी मानकन्हैय्या ट्रस्ट, अहिल्यानगरद्वारे हा पुरस्कार देण्यात येणार आहे. मानकन्हैया ट्रस्टचे नेत्रदान चळवळीसह स्त्रीजन्माचे स्वागत करा-बेटी बचाओचे देशव्यापी सामाजिक कार्य तसेच सांस्कृतिक, पर्यावरण व शैक्षणिक क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान आहे.

विजय कुवळेकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ पत्रकारितेसह साहित्य, चित्रपट, दूरचित्रवाणी आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. केसरी आणि सकाळपासून सुरू झालेला त्यांचा पत्रकारितेचा प्रवास पुढे विविध आघाडीच्या वृत्तपत्रांसह विविध वृत्तवाहिन्यांचा त्यांना प्रदीर्घ अनुभव आहे.

# गरजू विद्यार्थिनींना शिलाई मशीनचे वाटप राजकुंवर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा स्तुत्य सामाजिक उपक्रम

**फर्दापूर प्रतिनिधी :** फर्दापूर बनोटी राजकुंवर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जालना संचलित राजकुंवर महाविद्यालय बनोटी ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर येथे गरजू विद्यार्थिनींना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने शिलाई मशीन वाटपाचा सामाजिक उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींना शिक्षणाबरोबरच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून भरभरून कौतुक करण्यात येत आहे

कार्यक्रमातील प्रमुख उपस्थिती

अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष प्रा डॉ भगवानसिंग डोभाळ



प्रमुख उपस्थिती संस्थेच्या सचिव प्रा डॉ संगीता राजपूत

प्रमुख अतिथी कन्नड सोयगाव मतदारसंघाचे माजी आमदार उदयसिंग राजपूत बनोटी पोलीस स्टेशनचे संजय सिंघल भाजप तालुकाध्यक्ष सुनील भाऊ जाधव तसेच स्वप्निल भाऊ सोनवणे

मान्यवरांचे मार्गदर्शन व उद्देश

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना शिक्षणासोबतच कौशल्य विकासाचे महत्त्व अधोरेखित केले शिलाई मशीनच्या माध्यमातून विद्यार्थिनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारतील आणि भविष्यात स्वत च्या पायावर खंबीरपणे उभ्या राहतील असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला समाजातील गरजू घटकांना मदतीचा हात देणे हीच खरी सामाजिक बांधिलकी असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो असेही त्यांनी आवर्जून सांगितले

प्राचार्यांची ग्वाही

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा गजानन परदेशी यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून संस्थेच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला तसेच भविष्यातही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असे विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील अशी ग्वाही त्यांनी दिली

उपस्थिती व यशस्विता

याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा एस आर सोळंके प्रा जी पी चौतमल प्रा एस एन सोळंके प्रा व्ही आर कऱ्हाळे प्रा बी डी खैरनार प्रा एस डी महाले प्रा एन एल सोळंके प्रा एस एस मोहरे प्रा बी व्ही सोळंके प्रा एम व्ही साबळे प्रा एस एन खैरनार प्रा ए आर राजपूत तसेच शिक्षकेतर कर्मचारी अविनाश कोतकर चेतन वेहळे ऋतिक कोतकर यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# भागवत कराडकर यांच्या याचिकेत कारवाईस औरंगाबाद खंडपीठाची मनाई, विद्यापीठ आणि महाविद्यालय प्रशासनाला नोटीस

**छत्रपती संभाजीनगर :** मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एका महत्त्वाच्या रिट याचिकेत (रिट याचिका क्र. १००७५/२०२६) मोठा निर्णय देत याचिकाकर्ते भागवत अंकुश कराडकर यांना मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने या प्रकरणी प्रतिसज्जनांना नोटीस बजावली असून, तोपर्यंत याचिकाकर्त्यावर कोणतीही सक्तीची किंवा प्रतिकूल कारवाई न करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत.

याचिकाकर्ते भागवत अंकुश कराडकर यांनी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) आणि इतरांव विरुद्ध उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. डॉ. शिरीष एम. कांबळे हे काम पाहत आहेत. याचिकाकर्त्याच्या सेवा १६ नोव्हेंबर २०१५ पासून विधिवत मंजूर (Approved) असल्याचा दावा यात करण्यात आला आहे. याशिवाय वरिष्ठता, वेतननिश्चिती, वार्षिक वाढ, निवृत्तीवेतन लाभ (जेथे लागू असेल), पदोन्नतीचे लाभ आणि इतर सर्व सेवाविषयक अधिकार मिळण्यासाठी ते दावा सांगत आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी आणि न्यायमूर्ती आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठासमक्ष ३१ ऑगस्ट २०२६ रोजी या प्रकरणाची सुनावणी झाली. न्यायालयाने युक्तिवाद ऐकून घेत प्रतिवाद्यांना नोटीस जारी केली असून ती २८ सप्टेंबर २०२६ रोजी रिटर्न करण्यायोग्य आहे. तसेच, या प्रकरणाच्या पुढील सुनावणीपर्यंत याचिकाकर्त्याविरुद्ध कोणतीही प्रतिकूल कारवाई केली जाऊ नये, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

या आदेशाची अंमलबजावणी व माहिती म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव आणि घनसावंगी (जिल्हा जालना) येथील मॉडेल डिग्री कॉलेजचे प्राचार्य यांना ॲड. डॉ. शिरीष एम. कांबळे यांच्यामार्फत कायदेशीर नोटीस व आदेश पाठवण्यात आला आहे.



सावळदबारा प्रतिनिधी .दि. 5 सप्टेंबर रोजी राजुर येथे माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे याची भेट भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यानी घेतली

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911